ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २५ | पुणें, बुधवार तारीख २१ जानेवारी, १९५९ | अंक ३

## विविध माहिती

**भिलई येथील एंजिनिअर्सचा निश्चय**— भिलई येथें उभारण्यांत येत असलेल्या पोलादाच्या कारखान्यांतील पहिली भट्टी जानेवारीच्या २६ तारखेस उत्पादनास प्रारंभ करील. कारखान्यांत काम करणाऱ्या १,३०० एंजिनिअर्सनीं व अधिकाऱ्यांनीं असा निश्चय केला आहे कीं, भट्टी सुरू होईपर्यंत कोणीहि रजा घ्यावयाची नाहीं. कारखान्याच्या उभारणीच्या कामांत ६२६ रशिअन एंजिनिअर्स भाग घेत आहेत.

**कापडाच्या गिरण्यांची यंत्रसामुग्री**— भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें कापडाच्या गिरण्यांना लागणारी यंत्रसामुग्री आयात करण्यासाठी जपान, पूर्व जर्मनी आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्या देशांशीं खास करार केले आहेत. यंत्रसामुग्रीची किंमत मागाहून देण्याची सवलत मिळाली आहे. किंमत ४ ते ५ वर्षांच्या अवधींत चुकती करावयाची आहे.

**चांदा जिल्ह्याचा विक्रम**—नागपूर विभागांतील चांदा जिल्ह्यानें अल्प योजनेच्या मोहीमेंत विक्रम करून दाखविला आहे. ता. २७ डिसेंबर, १९५८ रोजीं ह्याबाबतची १५ दिवस मुदतीची मोहीम सुरू करण्यांत आली. चांदा जिल्ह्याचें उद्दिष्ट ८ लाख रु. ठेवण्यांत आलें होतें. पण, जिल्ह्यांत ८ लाख रुपयांची रक्कम १२ दिवसांतच जमा करण्यांत आली.

**रुपयाची नोट किती दिवस टिकते?**—१९४० च्या जुलैंत पहिल्या प्रथम १ रुपयाच्या नोटा काढण्यांत आल्या. १९४३ सालीं ह्या नोटा सरासरी १५ महिने टिकत. १९४५ सालीं २१ महिने टिकत. १९४७ मध्यें त्या सरासरी १५ महिने टिकूं लागल्या. त्यानंतर ह्या नोटांचें सरासरी आयुष्य १३ ते १७ महिन्यांचें झाल्याचें दिसतें. नोटांच्या हातबदलाच्या गतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेला ही सरासरी काढावी लागते.

**साखरेच्या कारखान्यांची यंत्रसामुग्री**—परदेशी चलनाच्या टंचाईमुळें साखरेच्या १२ संकल्पित कारखान्यांना परदेशांतून यंत्रसामुग्री आणणें अशक्य झालें आहे. ह्यापैकी ११ कारखाने सहकारी असून एक खाजगी मालकीचा आहे. भारतामधील यंत्रसामुग्री तयार करणाऱ्या कारखान्यांच्या दोन गटांनीं आतां सर्व यंत्रसामुग्री देशांतच तयार करण्याचें ठरविलें आहे. १९६०–६२ पर्यंत ४ संपूर्ण कारखाने बनविण्यांत येतील.

**कापड गिरण्यांचें उत्पादन**—भारतामधील कापड गिरण्यांच्या कापडाला येणारी मागणी घटल्यामुळें कापडगिरण्यांचें उत्पादन दरसाल ४८० कोटी वारांपुरतें मर्यादित करावें अशी सूचना मद्रास सरकारनें मध्यवर्ती सरकारला केली आहे. तथापि हातमागाच्या कापडाचा खप वाढविण्याचा एक उपाय म्हणून असा निर्बंध घालण्यांत येऊं नये असें मत मद्रासच्या उद्योग मंत्र्यांनीं व्यक्तिशः आपलें म्हणून व्यक्त केलें. उलट उत्पादन वाढवून तें निर्यात करण्यावर त्यांनीं भर दिला.

**भाक्रा–नांगल धरणाचें पाणी**—भाक्रा–नांगल धरणाच्या साह्यानें तयार होणारी वीज व धरणांतील पाणीपुरवठा वाटून घेण्यासंबंधी राजस्थान व पंजाब सरकारांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. नांगल येथील खताच्या कारखान्याला वीज पुरवितां यावी म्हणून राजस्थाननें धरणावर तयार होत असलेल्या विजेचा हिस्सा सोडला होता. तो वाटाहि आतां राजस्थानला मिळेल. धरणावरील विजेचा पुरवठा येत्या जूनपासून होईल.

**प्रजासत्ताक दिनासाठी आमंत्रण**—भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त व्हावयाच्या लोकनृत्यांत भाग घेण्यासाठी देशाच्या निरनिराळ्या भागांतील ८०० कलाकारांना आमंत्रणें धाडण्यांत आलीं आहेत. नृत्याचे कार्यक्रम २७ व २८ तारखेस नॅशनल स्टॅडिअमवर होतील. प्रत्येक दिवशीं १० लोकनृत्यें ठेवण्यांत आलीं आहेत.

**चीनबरोबरचा व्यापार तोट्याचा**—भारत व चीन ह्यांच्या दरम्यान होणारा व्यापार भारताला आंतबट्ट्याचा ठरत आहे. गेल्या दोन वर्षांत ह्या व्यापारांत भारताला २,५०,००,००० रुपयांची प्रतिकूल तफावत सोसावी लागली. उभयतां देशांत असलेल्या कराराप्रमाणें व्यापार समतोल ठेवण्याची अट नाहीं. परंतु, कांहीं प्रमाणांत तरी तोल राखण्याचे प्रयत्न करण्यांत येत असतात.

**अलेक्झांड्रिया येथील आरमारी कारखाना**—इजिप्तमधील अलेक्झांड्रिया येथील आरमारी कारखाना बांधण्याचें कंत्राट रशिआला मिळालें आहे. कारखाना उभारण्यासाठी ६० लाख पौंड खर्च येणार आहे. युगोस्लाव्हिआ व पश्चिम जर्मनी ह्यांनीं कमी खर्चाचीं टेंडर्स दिलीं असतांनाहि काम रशिआला देण्यांत आलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### बार्शी सें. को. बँक लि.

वरील बँक प्रथमपासून, गेलीं ५२ वर्षे, 'अ' वर्गांत आहे. १०७२ सभासद; १,३७,००० रु. शेअर भांडवल; २०,०८,५७६ रु. ठेवी; ५,२१,२५६ रु. इन्व्हेस्टमेंट्स; सोसायट्यांकडून येणें कर्ज ७,८८,७७२ रु., व्यक्तिमात्र सभासदांकडून येणें ६,४५,५७२ रु., असे बँकेच्या व्यवहाराचे प्रमुख आंकडे आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस २०,७३५ रु. निव्वळ नफा झाला. ६१/२% डिव्हिडंडला ८,३५० रु. लागले.

"ही बँक प्रथमपासून बार्शी तालुक्यांतील सोसायट्या व व्यक्तिसभासद यांना कर्जपुरवठा करीत आलेली असून तिनें या दोन्ही व्यवहारांत उत्तम प्रकारें काम केलें असून तालुक्यांतील सभासद व सोसायट्या यांच्यामध्यें सहकाराची भावना वाढवून परस्पर जिव्हाळा उत्पन्न केला आहे. याबद्दल माननीय वैकुंठराय मेहता यांचे सारस्यांचे धन्योद्गार मिळविले असून अशा तालुका कार्यक्षेत्राच्या बँकाच सहकारी कार्य अधिक कार्यक्षमतेनें करूं शकतील असाहि त्यांचा अभिप्राय असून तो सहकारी खात्यांतील अधिकारी व सहकारी चळवळींतील तज्ज्ञांनाहि मान्य आहे. तथापि रिझर्व्ह बँकेनें ग्रामीण पतपाहाणी व सहकार यासंबंधानें जी समिति नेमली होती त्या समितीचा अभिप्राय शेती कर्ज व्यवहार हा सोसायट्यांमार्फतच व्हावा व अशा सोसायट्यांस कर्जपुरवठा मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँकेनें करावा आणि मध्यवर्ती बँक जिल्हानिहाय एकच असावी असा आहे. तथापि असेंच काम करणारी जिल्ह्यापेक्षा कमी कार्यक्षेत्र असलेली पण कार्यक्षम असणारी अशी एखादी संस्था अस्तित्वांत असेल तर ती तशीच राहूं देण्यांत त्या समितीनेंहि आक्षेप घेतलेला नाहीं. अशी सर्व वस्तुस्थिति असतांहि आपल्या बँकेस, सोसायट्यांस शेतीकर्ज देण्याचा व्यवहार बंद करून तो सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या स्वाधीन करावा असा मे. रजिस्ट्रार साहेब यांचेकडून आदेश आला. सालअखेरच्या दोन-तीन दिवसच अगोदर हा आदेश आल्यानें डायरेक्टर बोर्डानें या बाबतींत तांतडीचा प्रयत्न करून प्रथम एक महिना व पुढें सप्टेंबर १९५८ अखेरपर्यंत वरील आदेशास तहकुबी मिळविली व आपल्या बँकेचें स्वरूप या पुढील काळांत कसें राहावयाचें यासंबंधीं अधिक वाटाघाटी करून निश्चित धोरण व घटना करण्याचे दृष्टीनें अधिकारी व माननीय सहकारमंत्री यांचेशीं पत्रव्यवहार व वाटाघाटी डायरेक्टर-बोर्ड करीत आहे."

### आष्टे को. अर्बन बँक लि., आष्टे (द. सातारा)

वरील बँकेचें वसूल भांडवल ४९,२०५ रु. असून एकूण फंड ११,५१३ रुपयांचे आहेत. ठेवींची रक्कम २,२०,७४२ रु. आहे. बँकेनें १,५०,७१७ रुपयांचीं कर्जे दिलीं आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ११,६०३ रु. उत्पन्न होऊन ८,१०८ रु. खर्च आला व ३,४९५ रु. निव्वळ नफा उरला. ५% डिव्हिडंडला २,३१८ रु. चा विनियोग करण्यांत आला. थकबाकीचें प्रमाण १६% चे ९% वर आलें आहे. (चेअरमन: दादा रामा चौगुले मॅ. डायरेक्टर: एन. ए. रुकडे)

### म्हैसूर किर्लोस्कर लि.

वरील कंपनीस ३० जून, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी २·५४ लक्ष रु. नफा झाला. १०·१४ लक्ष रु. घसारा काढून व ३·४५ लक्ष रु. करासाठी तरतूद करून हा नफा झाला आहे. डिव्हिडंड करमाफ ७१/२% दरानें वाटलें जाईल. मागील वर्षी ६% दरानें डिव्हिडंड दिले होते.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.

★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★

दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ


— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

श्री· वा· काळे ह्यांचीं

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें

१ कण आणि क्षण, २ पुढे पाऊल,

३ तुमचें स्थान कोणतें ?



किर्लोस्कर

इलेक्ट्रिक पंपिंग सेट

यांत्रिक दृष्ट्या परिपूर्ण व दीर्घकाल टिकाऊ.


आपल्या पिकांची जोपासना करण्यासाठीं एकमेव साधन म्हणजेच किर्लोस्कर पंपिंगसेट. भारतांत सर्वत्र समाधानकारकपणें काम करीत आहेत.

सविस्तर माहितीसाठीं लिहा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. २१ जानेवारी, १९५९


संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शास्त्रीय शिक्षण व संशोधनाच्या बाबतींत स्पर्धा

नवीन वर्षाच्या प्रारंभाला सोव्हिएट रशिआच्या शास्त्रज्ञांनीं व तंत्रज्ञांनीं सूर्याभोंवती फिरणारा पहिला मनुष्यनिर्मित उपग्रह अंतरिक्षांत सोडला. रशिआच्या ह्या घोडदौडीमुळें इंग्लंड-अमेरिकेसारख्या पाश्चात्य राष्ट्रांना चांगलाच हादरा बसला आहे. रशिआबरोबर चालू असलेल्या स्पर्धेत टिकाव धरतां यावा म्हणून त्यांनीं शास्त्रीय विषयांच्या शिक्षणावर व संशोधनावर अधिक लक्ष केंद्रित करण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेंतील शाळांतून व विद्यापीठांतून शास्त्रांच्या शिक्षणास अधिक प्राधान्य देण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें शास्त्र-संशोधन करणाऱ्या संस्थांना जास्त आर्थिक मदत देण्यांत येणार आहे. अमेरिकेंत गणित व पदार्थविज्ञान शास्त्र शिकविणारे चांगले शिक्षक मिळणें कठीण जातें. कारण, त्यांना आकर्षक वेतन मिळूं शकत नाहीं. अमेरिकेप्रमाणेंच ब्रिटननेंहि येत्या पांच वर्षांत शिक्षणावरील खर्च दुप्पट करण्याचें ठरविलें आहे. शास्त्रीय व औद्योगिक संशोधनखात्याचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम येत्या एप्रिल महिन्यापासून सुरू होणार आहे. ह्या कार्यक्रमाच्या कालांत खात्याला ६ कोटी पौंड मंजूर करण्यांत येणार आहेत. पहिल्या कार्यक्रमांत अवघे ३.६ कोटी पौंड मंजूर करण्यांत आले होते. अणुशक्तीविषयक संशोधन करण्यासाठी जी युरोपीय संघटना स्थापना करण्यांत आली आहे, तिला देण्यांत येणारी रकम ह्याशिवाय वेगळीच आहे. खात्याच्या अखत्यारांत शास्त्रीय संशोधन करणाऱ्या ४९ संघटना आहेत. विद्यापीठामार्फत होऊं शकणाऱ्या खास संशोधनासाठी मोठी रकम खर्च करण्यांत येणार आहे. दुसऱ्या कार्यक्रमाच्या शेवटच्या वर्षी विद्यापीठांतर्गत संशोधनावर २० लाख पौंड खर्च होईल आणि सुमारें ४,००० संशोधक विद्यार्थ्यांना खात्यातर्फे आर्थिक साह्य देण्यांत येईल.

---

## हातमागाच्या कापडाच्या निर्यातीसाठी संघटना

मद्रास येथें हातमागाच्या कापडाची निर्यात वाढविण्यासाठी एक नवीन संघटना स्थापन करण्यांत आली आहे. ही नवी संघटना हातमागाचें कापड युरोप, अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांना अधिक प्रमाणांत निर्यात करण्यावर आपलें लक्ष केंद्रित करणार आहे. १९५७ सालीं हातमागावर तयार झालेल्या व निर्यात करण्यांत आलेल्या मालाची किंमत जवळ जवळ ५.५६ कोटी रुपये झाली. पूर्वी हातमागाचा माल आयात करणारे प्रमुख देश पुढील होते: सीलोन, पूर्व आफ्रिका, आग्नेय आशिआ, पश्चिम आफ्रिका, मध्यपूर्व, इत्यादि. तथापि गेल्या तीन-चार वर्षांत युरोपांतील देश, अमेरिका आणि कॅनडा ह्या देशांकडून हातमागाच्या मालाला वाढत्या प्रमाणावर मागणी येऊं लागली. ह्या मालाची निर्यात वाढविण्याच्या कामीं कांहीं अडचणी येऊं लागल्या. मागणीप्रमाणें मालाचें उत्पादन करणें जरूर आहे असें आढळून आलें. त्याचप्रमाणें हातमागाच्या धंद्याला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठाहि नीट होत नव्हता. परदेशांत व्हावी तशी प्रसिद्धीहि होत नव्हती. ह्या व इतर अडचणी नाहींशा करण्यासाठी भारत सरकारला सल्ला देतां यावा म्हणून कांहीं परदेशीय तज्ज्ञांना भारतांत बोलावण्यांत आलें होतें. त्यांनीं हातमागाच्या प्रमुख उत्पादन-केंद्रांना भेटी देऊन अशी सूचना केली कीं भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें एक खास हातमाग-निर्यात-संघटना स्थापन करावी. त्याप्रमाणें ती आतां स्थापन करण्यांत आली आहे. हातमागाचें कापड विकणाऱ्या परदेशांतील घाऊक व्यापारी संस्था आणि फॅशन बनविणारे तज्ज्ञ ह्यांच्यामार्फत ग्राहकांच्या आवडीनिवडी नवी संघटना समजून घेणार आहे. आणि त्यांच्या आवडीनिवडींना जुळेल अशा प्रकारच्या कापडाचें उत्पादन मुद्दाम करवून घेणार आहे. त्याशिवाय जरूर त्या तलम सुताची, रंगांची व इतर कच्च्या मालाची आयातहि करणार आहे.

---

## परदेशीय प्रवाशांपासून होणारी प्राप्ति

भारतामधील प्रेक्षणीय स्थळें पहाण्यासाठी परदेशांतून येणाऱ्या हौशी प्रवाशांपासून देशाच्या परदेशी चलनांत महत्त्वाची भर पडत असते. म्हणून अशा प्रवाशांना भारतांत येण्यास उद्युक्त करण्याच्या प्रयत्नांचें स्वागत केलें पाहिजे. १९५८ साल प्रवाशांपासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या दृष्टीनें चांगलें गेलें आहे. गेल्या सालीं १ लाखांवर परदेशीय प्रवासी भारतांत आले आणि त्यांच्यामुळें २५० लाख रुपयांच्या परदेशीय चलनाची प्राप्ति झाली. १९६० साल हें ह्याहीपेक्षा चांगलें जावें म्हणून आणखी जोरानें प्रयत्न करण्यांत येणार आहेत. हें वर्ष भारत-भेटीचें म्हणून ठरविण्यांत आलें आहे, अमेरिकेंत व कॅनडांत आणखी एक एक कचेरी उघडण्यांत येणार असून वृत्तपत्रांतून जाहिरातींची मोहीमहि चालू करण्यांत येणार आहे. प्रवाशांना भारताच्या प्रवासासंबंधीं माहिती देणाऱ्या सात कचेऱ्या सध्यां युरोपांत व अमेरिकेंत आहेत. हौशी प्रवाशांना आपल्या सहली आगाऊ व्यवस्थितपणें आखतां याव्यात म्हणून युरोपमधील व अमेरिकेंतील वृत्तपत्रांचा उपयोग करून घेण्यांत येणार आहे. त्याचप्रमाणें अधिक प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी जादा प्रलोभनें आणि सवलती देण्याचा विचार करण्यांत येत आहे. देशांतर्गत प्रवासाच्या दरांत व रहाण्याच्या होटेलांच्या दरांत सवलती देणें, प्रवाशांना अधिक सुखसोयी उपलब्ध करून देणें, प्रवाशांचे मेळावे भरविणें, इत्यादि उपायांचाहि विचार करण्यांत येत आहे. मथुरा रोड येथें १९६० सालीं एक प्रदर्शन भरविण्यांत येण्याचा संभव आहे. सध्यां बहुतेक हौशी प्रवासी अमेरिकेंतून येतात. चालू वर्षी युरोपिअन देशांतील प्रवाशांना आकर्षित करण्याचे प्रयत्न करण्यांत येतील. पश्चिम आशिआंत प्रवासाची माहिती देण्याची सध्यां सोय नाहीं. त्याचप्रमाणें, जपानमधील चलनविषयक निर्बंधामुळें तेथेंहि अशी सोय नाहीं.

## आर्थिक विकासाच्या प्रयत्नांचें मूल्यमापन

भारत सरकारच्या अर्थखात्याचे आर्थिक सल्लागार श्री. जे. जे. अंजारिआ ह्यांनीं देशाच्या आर्थिक विकासासाठी पंचवार्षिक योजनांच्या द्वारां जे प्रयत्न करण्यांत येत आहेत, त्यासंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. मुंबई येथील कॉमर्स ग्रॅज्युएटस असोसिएशनपुढें बोलतांना ते म्हणाले कीं, विकासाच्या कार्यक्रमांत खरी अडचण आहे ती न वाढणाऱ्या शेतीच्या उत्पादनाची. शेतीचें उत्पन्न वाढविण्याच्या कामीं यश आलें तर भांडवलाच्या गुंतवणुकींत आणि रोजगारांत वाढ करतां येईल. भांडवलाची अधिक प्रमाणांत गुंतवणूक आणि रोजगाराची वाढ करण्याच्या कामांत अन्नधान्याचें मर्यादित उत्पन्न हा फार मोठा अडसर आहे. कारण, त्यांच्यामुळें जें नवें उत्पन्न समाजांत वाटलें जातें त्यांपैकी फार मोठा भाग अन्नधान्याच्या खरेदीवर खर्च केला जातो. तेव्हां हा प्रश्न कांहीं द्रव्यविषयक नाहीं; तो संघटनात्मक आहे. अन्नधान्याचें उत्पादन वाढवितां आलें तर भांडवलाची मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतां येणें शक्य होईल. गेल्या आठ वर्षांतील प्रयत्नांमुळें भारताची अर्थव्यवस्था बरीच बळकट झालेली असली तरी ती अजून स्वयंवर्धित होण्यास कांहीं काळ जावा लागेल. असें होण्यासाठीं द्रव्यविषयक आणि संघटनात्मक प्रयत्नांची व्याप्ति व तीव्रता वाढविण्यांत आली पाहिजे. देशाच्या विकासाच्या इतिहासांत तिसरा व चवथा पंचवार्षिक कार्यक्रम आणीबाणीचे ठरूं शकतील. ह्या कार्यक्रमांच्या काळांत भांडवलाची गुंतवणूक पुरेशी आणि योग्य प्रकारानें व काळजीपूर्वक झाली तर सर्व अडथळे दूर होऊं शकतील. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ज्या अडचणी आल्या त्या भांडवली मालाचें उत्पादन देशांतच होऊं लागेपर्यंत चालूं रहातील. म्हणून विकासाचा सध्यांचा वेग कमी करणें योग्य होणार नाहीं.

## किर्लोस्कर बंधु लि.

वरील कंपनीस ३१ जुलै, १९५८ अखेर संपलेल्या वर्षी ५·७० लक्ष रु. नफा झाला. गेल्या वर्षी तो ४·३९ लक्ष रु. होता. भागदारांना १०% डिव्हिडंड मिळणार आहे. मागील वर्षी तें ८% होतें. कंपनीची विक्री १·०९ कोटी रुपयांची झाली. कंपनीचें अधिकृत भांडवल सध्यां १ कोटी रु. आहे, तें १·५० कोटी रुपये करण्यांत येईल व त्यांतून प्रत्येकीं २५ रुपयांचे २ लक्ष प्रेफरन्स शेअर्स निर्माण केले जातील. प्रत्येकीं २५ रुपयांचे ३०,२५३ बोनस शेअर्स भागदारांना दिले जातील, त्यासाठी ३७,४४६ रु. शेअर प्रीमिअम अकौंटमधले व ७·१८ लक्ष रु. जनरल रिझर्व्हमधले वापरण्यांत येतील. कंपनीची परिस्थिति इतकी मजबूत आहे, कीं असे बोनस शेअर्स वाटण्यास कांहीच हरकत नाहीं.

## अमेरिकेंतील फॅमिली डॉक्टर

अमेरिकेंतील सर्वसाधारण फॅमिली डॉक्टराचें वय ४० वर्षे असतें. तो दररोज २६ पेशंटांना औषधोपचार करतो आणि दरसाल सुमारें ७५,००० रुपये कमावितो. तो दररोज आठ तास काम करतो, त्यांपैकीं सहा तास दवाखान्यांत व दोन तास व्हिजिटमध्यें जातात. शिकॅगो विद्यापीठानें २,४०० पेशंटस व त्यांचे ५०० डॉक्टर ह्यांच्या मुलाखती घेऊन असा निष्कर्ष काढला आहे. व्हिजिट फी साधारणतः २५ रुपये असते. मोठ्या शहरांत आणि चाळीस व पन्नास वर्षांवरील डॉक्टरांची फी ज्यास्त असते.

## अवार्डविरुद्ध अपिलास बँकेला परवानगी

इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल, दिल्ली, च्या अवार्डवर अपील करण्यास सुप्रीम कोर्टानें पंजाब नॅशनल बँकेला परवानगी दिली आहे. बँकेनें कांहीं नोकरांना बढती देऊन अधिकाऱ्यांची श्रेणी दिली होती, त्याबाबत हा वाद आहे. एप्रिल, १९५७ मध्यें बँकेनें अधिकाऱ्यांच्या दोन नव्या श्रेणी सुरू केल्या, पण त्यांच्या पगाराची तरतूद १९५४ च्या बँक अवार्डनें केलेली नव्हती. चालू सुपरवायझर्स दुसऱ्या ग्रेडमध्यें घालण्यांत आले होते. नंतर, कांहीं नोकरांना ह्या श्रेणींत आणण्यांत आलें, पण त्याला अट अशी घातली कीं त्यांचेवर बँकेचे नियम बंधनकारक होतील; बँक अवार्ड त्यांना लागूं पडणार नाहीं. बँक अवार्डचा त्यामुळें भंग होतो, ह्या मुद्यावर नोकरांनीं तक्रार केली. इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनलनें बँकेचें कृत्य गैरकायदा ठरवून नेमणुका रद्द केल्या होत्या, त्यावर हें अपील आहे.

## पासपोर्टशिवाय परदेश–प्रवास

फ्रान्स, प. जर्मनी, इटली, बेल्जम, ऑस्ट्रिया, ग्रीस आणि लक्झेंबर्ग ह्या देशांनीं एक करार केला आहे. त्याअन्वयें त्यांपैकी कोणत्याहि देशाचे नागरिक बाकीच्या देशांत व्हिसा व पासपोर्ट न घेतां जाऊं शकतील. ग्रेटब्रिटननें ह्या करारांत सामील होण्यास नकार दिला आहे. मि. अर्नेस्ट बेव्हिन हे ग्रेटब्रिटनचे परराष्ट्रमंत्री असतांना, त्यांनीं आपलें असें स्वप्न बोलून दाखविलें होतें, कीं कोणाहि इंग्रजाला व्हिक्टोरिया स्टेशनच्या तिकिटऑफिसांत कुठलेंहि तिकीट घेतां यावें; कुठेंहि जाण्याला व्हिसा व पासपोर्ट लागूं नये.

## काश्मीर भारतांत दाखविणाऱ्या नकाशास बंदी

ज्या नकाशामध्यें काश्मीर हा भारताचा भाग दाखविलेला असेल, असा नकाशा असलेलें कोणतेंहि वृत्तपत्र, मासिक किंवा पुस्तक पाकिस्तानांत आणतां कामा नये, असें पाकिस्तानी सरकारनें जाहीर केलें आहे. नकाशांतील जुनागड आणि मानवदार ह्यांच्या बाबतींतहि हीच बंदी आहे.

## कराचींतील विदेशी कलावंतांचे कार्यक्रम बंद

कराचीमधील हॉटेलांतून नृत्य करणाऱ्या विदेशी कलावंतांना द्यावे लागणारे पैसे परदेशीं धाडण्यास हुंडणावळ मिळणार नाहीं, असें स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें हॉटेल–मालकांना कळविलें आहे. त्यामुळें ३१ जानेवारीनंतर, हॉटेलांतील विदेशी कलावंतांचीं नृत्यें बंद झालीं आहेत.

## टेलिव्हिजनवरून ॲटॉमिक फिजिक्सचे पाठ

सात अमेरिकन शास्त्रज्ञ ( सर्वजण नोबेल पारितोषक धारण करणारे ) तेथील टेलिव्हिजनवरून ॲटॉमिक फिजिक्स समजावून सांगणार आहेत. त्याचा सुमारें २,७०,००० अमेरिकनांना फायदा होईल.

## दि सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९५८ मध्यें, शिल्लकी नफा धरून, एकूण १,१९,८६,११० रु. नफा झाला. भागदारांना १६% डिव्हिडंड मिळेल.

## चलनी नोटा व त्यांचें तारण

भारतांत चलनी नोटा काढण्याचा अधिकार एकट्या रिझर्व्ह बँकेलाच आहे. रिझर्व्ह बँकेच्या तक्त्यांतील देणीं या सदराखाली १६१३ कोटी रुपयांच्या चलनी नोटा दाखविल्या आहेत. म्हणजे, रिझर्व्ह बँकेनें तेवढ्या चलनी नोटा काढल्या असून त्यापैकी ११ कोटी रुपयांच्या नोटा बँकेच्या बँकिंग खात्यांत आहेत; बाकीच्या १६०२ कोटी रुपयांच्या नोटा व्यवहारांत खेळत आहेत.

ह्या, १६१३ कोटी रुपयांना ज्या जिंदगीचा आधार आहे, त्याचा तपशील तक्त्यांतील जिंदगीचे बाजूस दिलेला आहे. कायद्याप्रमाणें, ह्या जिंदगींत सोनें, विदेशी रोखे, रुपयाचीं नाणीं व रुपयांतील रोखे ह्यांचाच समावेश व्हायला हवा.

कायद्याप्रमाणें, तारण म्हणून असलेल्या सोन्याची किंमत ११५ कोटी रुपयांपेक्षा कमी असतां कामा नये; प्रत्यक्ष ठेवलेलें सोनें ११७ कोटी, ७६ लक्ष रुपयांचें आहे. विदेशी रोखे म्हणजे इंटरनॅशल मोनेटरी फंडाचा सभासद असलेल्या कोणत्याहि देशाच्या चलनांत ज्यांची रक्कम मिळेल, असे रोखे. कायद्याप्रमाणें, चलनी नोटांना तारण म्हणून असलेलें सोनें आणि विदेशी रोखे ह्यांची किंमत किमान २०० कोटी रुपये हवी, आणि त्यापैकी सोनें किमान ११५ कोटी रुपयांचे हवें. विदेशी रोखे मुळींच नसले, तरी चालेल. २ जानेवारीच्या तक्त्याप्रमाणें रिझर्व्ह बँकेच्या इश्यू खात्यांतील जिंदगीचे बाजूस १६५ कोटी रुपयांचे विदेशी रोखे आहेत.

"रुपयाचीं नाणीं" ह्यांत रुपयाच्या नोटांचाहि समावेश होतो; ह्या नाण्यांत बहुसंख्य नोटाच असतात. तक्त्यांतील जिंदगीचे बाजूस अशा १३६ कोटी रुपयांचीं 'नाणीं' आहेत.

सरकारी हिंदी रोख्यांत ट्रेझरी बिलें व इतर रोखे ह्यांचा समावेश होतो. तक्त्यांत दिसत असलेल्या ११९५ कोटी रुपयांच्या आंकड्यांत सरकारनें रिझर्व्ह बँकेला विकलेल्या ट्रेझरी बिलांचा (कृत्रिम तारणाचा) भरणा त्यांतहि मोठा आहे.

सरकारला पैसा अपुरा पडला, म्हणजे सहाजीकच त्याची रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्यांतील शिल्लक अटू लागते. ही शिल्लक वाढविल्याखेरीज सरकारला चेक कसें काढतां येणार? म्हणून सरकार ट्रेझरी बिलें (कृत्रिम रोखे) तयार करून रिझर्व्ह बँकेला विकते. हे रोखे इश्यू खात्याच्या जिंदगींत दाखल होतात. त्या रकमेइतक्या नव्या नोटा रिझर्व्ह बँक इश्यू खात्याच्या देणीं ह्या बाजूस जमा करते. ह्या जादा नोटा बँकिंग खात्यांत समाविष्ट होतात. बँकिंग खात्याच्या जिंदगीचे बाजूस त्या दिसतात व तेवढ्या रकमेची भर देणें बाजूकडील सरकारच्या ठेवींत घातली जाते. म्हणजे, सरकारी शिल्लक तेवढ्यानें वाढते आणि सरकारला त्यावर चेक काढतां येतात.

समजा, सरकारला ५ कोटी रुपये तातडीनें हवे आहेत. सरकार ५ कोटी रुपयांचीं ट्रेझरी बिलें रिझर्व्ह बँकेला देईल. म्हणजे, इश्यू खात्याच्या जिंदगींतील सरकारी रोखे ११९५ कोटी रुपयांऐवजीं १२०० कोटी रुपयांचे होतील आणि त्याबरोबरच देणीं बाजूला बँकिंग खात्यांतील नोटांत ५ कोटी रु. ची भर पडून त्यांची रक्कम ११ कोटी रु. ची १६ कोटी रुपये होईल. तेवढ्याच रकमेनें मध्यवर्ती सरकारची बँकिंग खात्यांतील शिल्लक वाढून ती ५८ कोटी रुपयांवर जाईल. म्हणजे, सरकारला ५ कोटी रुपये अधिक उपलब्ध होतील.


स्थापना १९३६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा**

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस-पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.
शाखा-मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, बार्शी, नासिक, लोणंद, कोल्हापूर, हलकर्णी, इचलकरंजी व फलटण.
लौकरच मुंबई दादर भागांत शाखा सुरू करणेंत येत आहे.

ता. ३०-६-५८ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ४,१५,००० |
| ठेवी | रु. | १,३२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,५३,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर:

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० |

दहा अगर अधिक वर्षे रु. ४·००

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | " | २·५० |
| चालू डिपॉझिट | " | ०·५० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेत मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन



स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

**दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकलिपत भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९५,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० " |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० " |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. ग. गो. ढोले, (उपाध्यक्ष)
श्री. उ. भा. तांबे, (ऑ. मॅ. डायरेक्टर)
श्री. म. वा. बेंडे, (ऑ. खजिनदार)
श्री. म. मा. वामन डायरेक्टर
श्री. ग. ल. पाटील नलवडे "
श्री. आ. पां. ढोरे "
श्री. ज्ञा. मा. मनसुख "
श्री. म. रा. नेहरकर "

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें इश्यू खातें

२ जानेवारी, १९५९

| देणीं | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| बँकिंग खात्यांतील नोटा | ११,०७,५३,००० | भारतांतील सोनें | १,१७,७६,०३,००० |
| प्रचारांतील नोटा | १६.०१,९९,७३,००० | विदेशी रोखे | १,६४,६७,५६,००० |
| एकूण काढलेल्या नोटा | १६,१३,०७,२६,००० | सोनें + विदेशी रोखे | २,८२,४३,५९,००० |
| | | रुपयांचीं नाणीं | १,३५,८४,८६,००० |
| | | सरकारी रुपयांतील रोखे | ११,९४,७८,८१,००० |
| एकूण देणीं | १६,१३,०७,२६,००० | एकूण जिंदगी | १६,१३,०७,२६,००० |

## रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचें बँकिंग खातें

२ जानेवारी, १९५९

| देणीं | रु. | जिंदगी | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ५,००,००,००० | नोटा | ११,०७,५३,००० |
| रिझर्व्ह फंड | ८०,००,००,००० | रुपयाचीं नाणीं | ३,९६,००० |
| नॅशनल ॲग्रि. क्रेडिट | | दुय्यम नाणीं | ४,२०,००० |
| ( लाँगटर्म ऑपरेशन्स ) फंड | २५,००,००,००० | सरकारी ट्रेझरी बिलें | १२,२४,५५,००० |
| नॅशनल ॲग्रि. क्रेडिट | | परदेशांतील शिलका | २४,५२,३८,००० |
| ( स्टॅबिलायझेशन ) फंड | ३,००,००,००० | सरकारांना कर्जें | २५,२५,४३,००० |
| ठेवी:— | | इतर कर्जें | ७७,४३,३५,००० |
| ( अ ) सरकारी | | इन्व्हेस्टमेंट | २,६५,६७,१५,००० |
| ( १ ) मध्यवर्ती सरकार | ५२,९८,९०,००० | इतर जिंदगी | ११,०७,०९,००० |
| ( २ ) इतर सरकारें | १८,५१,८२,००० | | |
| ( ब ) बँका | ७६,५६,०३,००० | | |
| ( क ) इतर | १,१८,१४,३२,००० | | |
| बिल्स पेएबल | १८,४१.०३,००० | | |
| इतर देणीं | २९,७३,४४,००० | | |
| रुपये | ४,२७,३५,५४,००० | रुपये | ४,२७,३५,५४,००० |

**जपानच्या कापडाची निर्यात**— जपानच्या व्यापार-खात्यानें आग्नेय आशिआंत करण्यांत येणाऱ्या सुती कापडाच्या निर्यातीवर निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. जपानी कापड हाँगकाँग, व्हिएटनाम, सयाम, सिंगापूर, इत्यादि देशांना निर्यात होतें. गेल्या वर्षी जपाननें ह्या भागांत सुमारें ४२ कोटी वार कापड निर्यात केलें होतें. १९५७ सालची निर्यात ६० कोटी वार होती.

**औषधांच्या किंमती ठरविणार**— पाकिस्तान सरकारनें सर्व देशभर आयात औषधांच्या किंमती ठरवून देण्याचें निश्चित केलें आहे. औषधविक्रेत्यांकडून औषधांची आयात, त्यावरील आयात कर, विमा, इत्यादि बाबींची माहिती मागविण्यांत आली आहे. गेले कांहीं दिवस कराचींतील औषधाचे मोठे दुकानदार औषधांच्या किंमती बाटल्यावर लिहीत आहेत. तसें न करणें हा गुन्हा आहे.

**आसाममध्यें कॉफीची लागवड**—सेंट्रल कॉफी-बोर्डाच्या अध्यक्षांनीं आसाममधील डोंगरी भागांत करण्यांत आलेल्या कॉफीच्या लागवडीची पाहाणी केली. त्यांच्या मतानें, आसाममधील हवा कॉफीच्या लागवडीसाठी दक्षिण भारतामधील हवेपेक्षा अधिक चांगली आहे. आसाममध्यें उत्तम प्रतीच्या कॉफीच्या झाडांची लागवड करण्यास खूपच वाव आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें.

**भारत-रशियाचा प्राचीन व्यापार**—भारत व रशिया ह्यांच्या दरम्यान १८ व्या शतकाच्या मध्यास चालणाऱ्या व्यापारासंबंधी कांहीं महत्त्वाचे कागदपत्र रशियांत उपलब्ध झाले आहेत. १७६० मध्यें कलकत्त्यास आलेल्या एका रशियन इसमाच्या कलकत्त्यामधील वास्तव्याचें वर्णन त्यांत आहे. भारतांत पहिला रशियन गृहस्थ १५ व्या शतकांत आलेला आहे.

**रामेश्वर येथील देवळाचा पाया**—दक्षिण भारतांतील रामेश्वर हें प्रसिद्ध तीर्थक्षेत्र समुद्रतीरावर वसलेलें आहे. रामेश्वरच्या देवळाचा पाया चांगल्या स्थितींत आहे कीं नाहीं ह्याविषयीं शंका व्यक्त करण्यांत आली होती. एक वर्षापूर्वी सरकारतर्फे देवळाची पहाणी करण्यांत आली होती. आतां देवळाच्या मजबुतीच्या दृष्टीनें पुन्हा तपासणी करण्यांत येणार आहे.

व्यावसायिकच नव्हे तर दैनंदिन व्यवहाराच्या सौंदर्याकरिताहि

## उत्तरासाठी पोस्टेज पाठवा

लेखक—श्री. श्री. वा. काळे

"लेख, कविता, फोटो, इत्यादि साहित्य प्रसिद्धीसाठी पाठवितांना परतीसाठी पुरेसें पोस्टेज पाठवावें; नाहींतर नापसंत साहित्य एक महिन्यानंतर निकालांत काढलें जाईल" अशा अर्थाची लेखकांना सूचना बहुतेक मासिकांतून दिलेली दिसून येते. मासिकांच्या संपादकांकडे दरमहा शेंकडों लेख येतात; त्यांपैकी बहुतेक सर्व लेख लेखकांनीं आपण होऊन पाठविलेले असतात; संपादकांनीं ते मागविलेले नसतात. अशा नवशिक्या लेखकांच्या लेखांपैकी दरमहा एकादाच लेख संपादकांच्या पसंतीस उतरतो. नापसंत लेख परत करायचें म्हटलें तर तें कितीतरी खर्चाचें काम होऊन बसेल. पण लेखकाला मात्र परतीसाठी पोस्टेज पाठविण्यांतील ही व्यावहारिक बाजू कळत नाहीं.

आपण दुसऱ्याला जेव्हां एखादी गोष्ट करायला सांगतों तेव्हां त्याचा त्याला प्रत्यक्ष कांहींहि फायदा होण्याचा संभव नसेल तर त्याबद्दल त्याला भूर्दंड न पडणें हें श्रेयस्कर असतें. दुकानदार, कारखानदार व इतर फर्म्स ह्यांना दुसऱ्यांकडून माहिती मागविण्याची नेहमीं पाळी येते. अशा वेळीं माहिती पाठविणाराला खर्चांत न टाकणें योग्य ठरतें. माहिती गोळा करून पाठविणाराला बराच वेळ खर्च करावा लागतो; त्यांत आणखी तिकिटांच्या खर्चाची भर कशाला? जोडकार्ड किंवा पत्ता-तिकीट असलेलें पाकीट माहिती मागविणारानें पाठविलें तर त्याला लवकर माहिती मिळूं शकते असा अनुभव आहे.

लिमिटेड कंपन्यांच्या वार्षिक सभांच्या वेळीं प्रॉक्झी गोळा केल्या जातात. ज्यांना सभेस उपस्थित होतां येणार नाहीं, अशांकडून प्रॉक्झी मागविण्यांत येतात. म्हणजे त्यांच्या वतीनें सभेंत मत देण्याचा अधिकार प्राप्त होतो. कंपन्यांचे मॅनेजिंग एजंट्स व डायरेक्टर अशा रीतीनें प्रॉक्झी गोळा करून ठेवतात. त्यामुळें त्यांच्याजवळील मतांची संख्या भरपूर होते व त्यांना आपले ठराव मंजूर करून घेण्यास प्रत्यक्ष उपस्थित असणाऱ्या कांहीं विरोधकांची अडचण भासत नाहीं. अशा गरजेच्या वेळीं आपल्या साहाय्यक भागीदारांना जी विनंती केली जाते तिला प्रॉक्झीचा कागद जोडलेला असतो. ह्या प्रॉक्झीवर आवश्यक असलेलें तिकीट चिकटविलेलें असतें आणि प्रॉक्झी सही करून धाडण्यासाठी भागीदाराला खर्च येऊं नये म्हणून पत्ता-तिकीट असलेलें पाकीटहि सोबत असतें. आपल्या अत्यंत गरजेच्या वेळीं जें सुचतें, तें इतर वेळीं सुचत नाहीं असें नाहीं. पण तिकडे दुर्लक्ष केलें जातें एवढेंच.

### सौजन्याचा गैरवाजवी फायदा घेऊं नये

वधूचे पालक वराच्या पालकांकडे वधूचा फोटो पाठवितात तेव्हां तो फोटो दुसऱ्यांच्या हातीं निष्कारण राहूं नये, आपल्याकडे परत यावा, अशी त्यांची तीव्र इच्छा असते. त्या समयीं फोटोच्या परतीसाठी साधें पोस्टेजच नव्हे, तर रजिस्ट्रेशनला पडणारें पोस्टेजहि फोटोबरोबर धाडलें जातें. त्यामुळें फोटो परत मिळणें सोपें जातें. स्वाक्षऱ्या मिळविणारीं लहान मुलेंसुद्धां तिकीट लावलेलें, पत्ता लिहिलेलें पाकीट धाडण्यास विसरत नाहींत. त्यांना ह्या सोईचें महत्त्व पटतें. दुसऱ्याच्या सौजन्याचा फायदा मिळवितांना मात्र ही साधी बाब सोईस्करपणें लक्षांत रहात नाहीं.

घरगुती पत्रव्यवहाराच्या वेळींहि अशीच सोय पाहिली गेली तर किती बरें होईल! स्थळांची माहिती मागविणारीं, चौकशी करणारीं पत्रें थोड्या ओळखीच्या, बिन-ओळखीच्या लोकांकडून बऱ्याच वेळां येतात तेव्हां त्याबरोबर उत्तरासाठी तिकीट लावलेलें कार्ड किंवा पाकीट त्यांनीं पाठवायला काय हरकत आहे? अशामुळें भावना दुखविल्या जातील असें सांगितलें जाण्याचा संभव आहे; पण स्वतःवरून इतरांची परीक्षा केली तर हा धोका काल्पनिक आहे हें सहज लक्षांत येईल. माहिती गोळा करायला जो त्रास सोसावा लागतो, वेळ खर्च होतो, वाहनांचा खर्चहि येतो, त्यांत टपालखर्चाची भर पडली नाहीं तर किती बरें होईल! पत्राचें उत्तर सत्वर येण्याला त्यामुळें मदतच होईल. उत्तरासाठी जोडकार्ड किंवा टपालहंशील पाठवितांना, "आपणांस सत्वर उत्तर धाडणें सोईचें होईल त्यासाठी सोबत जोडकार्ड किंवा पाकीट जोडलें आहे", असें लिहिलें किंवा कांहींच लिहिलें नाहीं तरी कार्यसिद्धि होईल.

### व्यवहारी दृष्टिकोन

आपल्यासाठी दुसऱ्याला जो खर्च पडतो तो त्याला सोसावा लागूं नये, आपणच सोसावा, एवढेंच येथें सुचवावयाचें आहे. त्यामुळें, आपलेंहि काम लवकर होतें; दुसऱ्याला आळस करावासा वाटत नाहीं आणि व्यवहाराला सौकर्य प्राप्त होतें. खर्च देऊं करून आपण दुसऱ्याच्या चांगुलपणाला आवाहन करतों. अशा बैठकीवरील व्यवहार उभयपक्षीं समाधानकारक होतात. दुसऱ्याला आपल्यासाठी एखाद-दुसरा आणा जरी खर्च करावा लागला तरी त्याची जाणीव आपण व्यक्त करणें हिताचें असतें. दुसऱ्याकडून फुकट गोष्टी घेण्याची प्रथा अत्यंत अनिष्ट आहे. दैनंदिन जीवनास त्यामुळें अप्रस्तुत वळण लागतें, टाळाटाळ सुरू होते, गैरसमज वाढतात, अपरोक्ष निंदा केली जाते, कामें होत नाहींत. 'आपला' व 'दुसरा' ह्यांतील फरक मात्र नीट ओळखला पाहिजे. टपालखर्चाची बाब दिसायला साधी असली, तरी ती नव्या, व्यवहारी दृष्टिकोनाची निदर्शक आहे.

— उद्यम, डिसेंबर, १९५८.

---

### दि इचलकरंजी अर्बन को. बँक लि.

बँकेचें स्वतःचें भांडवल (शेअर भांडवल व फंड) ३,५६,०१६ रु. चें ३,८६,२०९ रु. वर गेलें आहे. मागील वर्षी २५,७०,७५९ रु. च्या ठेवी होत्या, त्या १९५७-५८ अखेर २६,६३,३३४ रु. च्या झाल्या. बँकेचें खेळतें भांडवल अहवालाच्या वर्षांत ३०,२७,७१८ रु. चें ३१,६१,२४६ रु. झालें. बँकेनें ४,२४,४३४ रु. रोख व बँकांत ठेवून आणि १५,२१,२७३ रु. ची इन्व्हेस्टमेंट करून ११,६६,८६९ रु. चीं कर्जें दिलेलीं आहेत. अहवालाचे सालीं बँकेस ३९,०३६ रु. नफा झाला. त्यापैकी १२,१९७ रु. इमारतनिधींत टाकल्यानें तो निधि आतां सुमारें ८० हजार रु. झाला आहे. बँकेच्या आजरें शाखेचा व्यवहारहि समाधानकारक झाला आहे.

(चेअरमन: यशवंत विठ्ठल दातार. मॅनेजर: दौलतराम रावजी काळे)

---

**शहरांतील उत्पन्नाची मर्यादा**—एका माणसानें धारण करावयाच्या जमिनीवर ज्याप्रमाणें मर्यादा घालण्यांत आली आहे, त्याचप्रमाणें शहरांतील उत्पन्नावरहि मर्यादा घालण्यांत यावी अशी मागणी कांहीं काँग्रेस खासदारांनीं केली होती. पंतप्रधान नेहरू ह्यांनीं शहरी उत्पन्नावर मर्यादा घालण्याचा सरकारचा विचार नाहीं असें जाहीर केलें आहे. अशा मर्यादेनें पुढाकार घेण्याच्या वृत्तीला पायबंद बसेल असें त्यांचें म्हणणें आहे.

## लहान व मध्यम उद्योगधंद्यांचें यांत्रिकीकरण वाढणार

"युनायटेड स्टेट्स ट्रेड मिशन टू नॉर्दर्न इंडिया" मध्यें सहा जणांचा समावेश होता. ह्या मंडळानें नोव्हेंबर, १९५८ ते जानेवारी १९५९ ह्या मुदतींत मध्यवर्ती, पंजाब, राजस्तान व उत्तर प्रदेश सरकारांच्या भेटी घेतल्या आणि सुमारें ३,००० हिंदी व्यापाऱ्यांशी चर्चा केली. भारत व अमेरिका ह्यांचे व्यापारी संबंध वाढविण्याविषयीं बोलणीं झालीं. ह्या मंडळाचा अहवाल आतां प्रसिद्ध झाला आहे.

अमेरिकन व्यापाऱ्यांची विश्वासार्हता, तांत्रिक उच्च दर्जा व मिळतें घेण्याची तयारी, ह्याविषयीं हिंदी व्यापाऱ्यांनीं कौतुक केलें. मंडळानें आपल्याबरोबर व्यापारी व औद्योगिक मासिकांचीं २,००० बांधलेलीं पुस्तकें आणलीं होतीं, त्यांचा बराच उपयोग करून घेण्यांत आला.

भारताला परराष्ट्रीय हुंडणावळीची अडचण भासत आहे, लोकसंख्येचा ताण असह्य होत आहे आणि औद्योगिक व व्यापारी प्रगतीच्या मार्गांत इतरहि कांहीं अडथळे आहेत, हें मंडळानें भारतांत येण्यापूर्वीच माहीत करून घेतलें होतें. औद्योगिक क्षेत्रांत भारत करीत असलेले प्रयत्न मंडळाला प्रत्यक्ष पहावयास मिळाले.

मशीन टूल्स, मेटल वर्किंग मशीन्स, कागद व कागदाचे जिन्नस, विजेचे बल्ब, विजेचीं घरगुती उपकरणीं, एअर कंडिशनिंग साहित्य, रेडिओ, लहान अश्वशक्तीच्या मोटारी, रस्ते तयार करण्याचीं यंत्रें, इनसुलेशनचें साहित्य, बूट करण्याचीं यंत्रें, हार्डवेअर, इस्पितळांची व शस्त्रक्रियेची सामुग्री, इत्यादींचें उत्पादन भारतांत लवकर प्रगति करूं शकेल असें मंडळानें म्हटलें आहे.

लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांच्या वाढीच्या कार्यक्रमाकडे मंडळाचें विशेष लक्ष गेलें. अशा उपक्रमांच्या बाबतींत अमेरिकन व्यापारी वर्गाला मदत करतां येण्याजोगी आहे. यंत्रसामुग्री वापरणारे लहान कारखाने अधिकाधिक प्रमाणांत मोठ्या कारखान्यांना पूरक उत्पादन करूं शकतील. अशा लहान कारखान्यांना जी यंत्रसामुग्री लागेल, ती उपलब्ध करून देणें भारताला आजच्या आर्थिक सिद्धतेच्या अनुभवानें जमणार नाहीं आणि बाहेरून मागविणें परवडणार नाहीं, असें मंडळाचें मत आहे. तेव्हां, अशा यंत्रसामुग्रीच्या उत्पादनांत अमेरिकन-हिंदी सहकार्यास खूपच वाव आहे.

लहान उद्योगधंद्यांनीं यंत्रसामुग्रीचा वाढत्या प्रमाणावर उपयोग केला म्हणजे दर नगामागें येणारा उत्पादनखर्च कमी होईल, रोजगारांत वाढ होईल आणि राहणीचा दर्जा सुधारण्यास मदत होईल. अमेरिकन बनावटीची यंत्रसामुग्री इतर देशांकडून मिळणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या मानानें महाग पडते, अशी तक्रार आहे; तथापि पहिली किंमत जास्त असली तरी यंत्रसामुग्रीची कार्यक्षमता व चालविण्याचा खर्च ह्याबाबतींत अमेरिकन यंत्रसामुग्री किफायतशीर ठरते, असें त्या तक्रारीस मंडळाचें उत्तर आहे.

अमेरिकेंतील बाजारपेठेंत प्रवेश कसा करावा, ह्याविषयीं मंडळाकडे पुष्कळांनीं विचारणा केली. विक्रीचीं योग्य तंत्रें वापरलीं तर हिंदी हस्तव्यवसायाचा माल अमेरिकेंत खपूं शकेल. पण, अमेरिकन बाजारपेठेचा अधिक चांगला परिचय निर्गत व्यापाऱ्यांनीं करून घेतला पाहिजे. अमेरिकेंत एक विक्री-केंद्र ठेवावें, मालाचा दर्जा कायम राखावा व ठरल्यावेळीं माल पोंचता केला जावा, असें मंडळानें सुचविलें आहे.

भारतांत अधिकाधिक अमेरिकन प्रवासी आकर्षता आले, तर भारताला परराष्ट्रीय हुंडणावळ मिळूं शकेल आणि अमेरिकनांनाहि भारताचें खरेंखुरें ज्ञान होण्यास साहाय्य होईल.

दिल्ली येथील अमेरिकन वकिलात आणि मुंबई, कलकत्ता व मद्रास येथील व्यापारी कचेऱ्या, ह्यांचा हिंदी व्यापारीवर्गानें भरपूर फायदा करून घ्यावा, असा मंडळाचा आग्रह आहे. तेथील अधिकाऱ्यांचा अमेरिकन व्यापारी खात्याशीं दैनंदिन संबंध असतो व त्यामार्फत अमेरिकन व्यापारीवर्गाशींहि त्यांचा संबंध येतो.

---

## महाराष्ट्र रीजनल को-ऑपरेटिव्ह स्कूल, पुणें-१

(नं. १० बी. जे. रोड, टाटा लॉज, पुणें-१)

को-ऑपरेटिव्ह डिप्लोमा परीक्षा-सप्टेंबर १९५८: रिझल्ट

(२२ वा शिक्षण-वर्ग)

खालील विद्यार्थी परीक्षेंत उत्तीर्ण झाले आहेत:—

**पहिला वर्ग:**—आर. पी. देशमुख, एस. आर. माणकापुरे.

**दुसरा वर्ग:**—के. एस्. आणेकर, एस. व्ही. आरळी, व्ही. बी. बटगेरी, बी. टी. ढावरे, एन्. जी. देशमुख, व्ही. बी. कदम, आर. डी. काकडे, बी. एम्. कुलकर्णी, एम्. एन्. लोंढे, पी. आर. माने, एल्. एन्. मेरगू, पी. एस. मोहिते, बी. सी. नेमाडे, ए. टी. ओळकर, एम्. एम्. पाटील, एस. डी. पाटील, के. ए. पवार, एस. पी. फरांदे, जी. एस. राजपुत, जी. आर. रानडे, बी. एन्. शेख, व्ही. व्ही. शेकदार, एल्. आर. शिंदे, एम्. जी. थिटे, के. टी. थोरात, डी. एल्. उदावंत, डी. एस्. वाणी, आर. के. भापकर, एन्. डी. चितळीकर, आर. डी. देखणे, जे. टी. कुलकर्णी, एम्. डी. नवघरे.

**तिसरा वर्ग:**—एस. व्ही. गाडवे, जे. डी. गायकवाड, पी. आर. कुलकर्णी, जे. जी. म्हात्रे, एल्. बी. नातू, एस. के. निकम, व्ही. आर. पाटक, ए. एन्. पाटील, बी. एस्. पाटील, डी. डी. पाटील, के. पी. पाटील, डी. जी. पेंढारकर, डी. वाय. प्रधान, एस्. आर. रोकडे, डी. बी. रुरनाईक, व्ही. ए. शेंद्रे, जी. एस्. पाटील, व्ही. डी. उकिरडे, एम्. आर. पठाण, एम्. व्ही. मुतालिक.

आर. डी. भोसेकर,
सुपरिन्टेन्डेन्ट,
म. री. को-ऑप. स्कूल, पुणें-१

---

## युनायटेड कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस १९५८ मध्यें ४५·८७ लक्ष रु. नफा झाला. गेल्या वर्षी ५९·९९ लक्ष रु. नफा झाला होता. प्रत्येक भागास ३·७५ रु. डिव्हिडंड कायम राखण्यांत आले आहे. पण, रिझर्व्ह फंडांत १९ लक्ष रु. ऐवजीं १४ लक्ष रु., करासाठी १८·५ लक्ष रु. ऐवजीं ९ लक्ष रु., अशा कमी तरतूदी करण्यांत आल्या. नोकरांना बोनस मात्र ७ लक्ष रु. वरून ७·२५ लक्ष रु. वर गेला. मागील वर्षाचा शिल्लक नफा २९,४१९ रु. होता; आतां तो ६२,००० रु. राहील.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.